बीड । मंगळवार

२६.०३.२०२५

वर्षे : ४ अंक : ३४७

किंमत : ३ रू. पाने : ४


दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955






# तयारीला लागा ! राज्यात तब्बल 10,000 पोलिसांची भरती होणारं

मुंबई । प्रतिनिधी

**पोलिस भरतीसाठी तयारी करणाऱ्या तरुणांसाठी आनंदाची बातमी आहे. आता राज्यात १० हजार पोलिसांची भरती केली जाणार आहे. १५ सप्टेंबर २०२५ पासून ही भरती केली जाणार आहे. गृह विभागाने २०२४ व डिसेंबर २०२५ पर्यंतची रिक्त पोलिसांची पदे भरण्याची मान्यता दिली आहे. त्यानंतर आता लवकरच पोलिस भरती सुरु होणार आहे.**

**पोलिस भरतीचे निकष**

**पोलिस भरतीमध्ये एका पदासाठी एकाच ठिकाणी अर्ज करायचे आहे. जर तुम्ही जास्त अर्ज भरले तर ते बाद करण्यात येईल. दोन ठिकाणी अर्ज केल्याबद्दल उमेदवाराला बाद ठरवण्यात येईल. जर एखादा उमेदवार दुसऱ्या जिल्ह्यात उपस्थित राहिला तर त्याला दोन ठिकाणी अर्ज केल्याबद्दल चाचणी देता येणार नाही. या भरतीसाठी ४ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.**

सध्या उन्हाळा सुरु आहे. उन्हाळ्यानंतर पावसाळा सुरु होणार आहे. त्यामुळे गणेशोत्सवानंतरच पोलिस भरतीची मैदानी चाचणी सुरु होणार आहे. साधारणपणे १५ सप्टेंबरनंतरच पोलिस भरतीची प्रक्रिया सुरु होईल, असं सांगण्यात येत आहे. यंदा पोलिस भरतीमध्ये (Police Bharti 2025) एकूण १० हजार पदे भरली जाणार आहे. राज्यात गणेशोत्सव झाल्यानंतर लगेचच पोलिस भरती होणार आहे. ६ सप्टेंबरला गणपती विसर्जन होतील.त्यानंतर भरती प्रक्रिया राबवण्याचे नियोजन गृह विभागाने केलं आहे. यंदा १० हजार पोलिस भरतीसाठी १२ ते १३ लाख अर्ज येऊ शकतात. उन्हाळ्यात तापमान जास्त असल्याने सध्या पोलिस भरती घेतली जाऊ शकणार नाही. पावसामुळे मैदानी चाचणी घेता येणार नाही. त्यामुळे सप्टेंबरमध्येच ही भरती घेण्यात येणार आहे.

मागच्या वर्षी २०२४ मध्ये पोलिस भरतीच्या १७ हजार जागांसाठी १७ लाख अर्ज आले होत. दरम्यान, आताही काही लाखांमध्ये अर्ज येण्याची शक्यता आहे.



# गरिबी वाईट हो... 3 वर्षांच्या बाळाला दगडाला बांधून कडक उन्हात आईची मजूरी

सातारा । प्रतिनिधी

माणसाला घडवण्यात, बिघडवण्यात, संकटावर मात करण्यास परिस्थिती शिकवते. म्हणूनच गरिबी वाईट नसते, खरतंर हीच गरीबी आपल्याला लढायला शिकवते, असे म्हणले जाते. जबाबदारी ही वय पाहून येत नाही, पण एकदा आली की खांदे मजबूत करून जाते. आई जगातील सर्वात मोठा योद्धा आहे असं म्हटलं जातं, कारण तिची तुलना इतर कोणाशीच होऊ शकत नाही. ती स्वत:चा त्रास विसरुन आपल्या मुलांची काळजी घेत असते. आईच्या त्यागाच्या आणि शौर्याच्या अनेक गोष्टी आपण ऐकत आणि पाहात असतो. पोटच्या मुलाला दगडाला बांधून म



जुरी करणाऱ्या आईचा एक भयान वास्तव्य दाखवणारा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. लहान मुलाला दगडाला बांधून आई मजुरीचे काम करते. सातारा जिल्ह्यातल्या महाबळेश्वरमधील हा व्हिडीओ असून सध्या तो चर्चेत आला आहे.हा व्हिडीओ पाहून तुमच्याही काळजाचं पाणी होईल..

या व्हिडीओमध्ये तुम्ही पाहू शकता, एका मोलमजुरी करणाऱ्या आईने आपल्या तीन वर्षांच्या निष्पाप बाळाला दगडाला बांधून ठेवलं आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून, पाहणाऱ्यांचे डोळे पाणावले आहेत. आईच्या या कृतीमागे क्रूरता नसून असहायता आणि गरीबीचा आक्रोश आहे.

दरम्यान युट्युबर शितल दानवले यांनी यावेळी मुलाच्या आईला यासंदर्भात विचारले. मुलगा ३ वर्षांचा झाला तरी त्याला बोलता येत नाही. या मुलाला दवाखान्यात दाखवलं नाही का? असा प्रश्न त्याच्या आईला विचारण्यात आला तेव्हा त्यांनी दिलेले उत्तर हृदय हलवून टाकणारे होते. या मुलाच्या आईने सरळ पैसे नाहीत त्यामुळे दवाखान्यात त्याला नेले नाही असे सांगितले. मजुरीचे काम करत असताना आपल्या नजरेपासून आपलं लेकरू लांब जाऊ नये यासाठी त्याच्या पायाला दगड बांधून काम करण्याची वेळ या आईवर आली. 'मी एक शेतकरी महिला आहे माझ्या परीने जेवढं करता आलं तेवढं मी केलं. या लेकराला बोलता यावं या लेकराला मदत मिळावी आणि शासनाने या लेकराकडे लक्ष द्यावं ही माझी विनंती आहे.


# पालिकेच्या मालकीचे ओपनस्पेस गिळंकृत करणाऱ्यांचा होणार पर्दाफाश : मुळूक

## उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशनंतर मुख्याधिकाऱ्यांनी नेमली चौकशी समिती

बीड । प्रतिनिधी

बीड नगर पालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने लहान मुलांना खेळण्यासाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी गार्डनकरीता आरक्षित असलेले शहरातील नगरपालिकेच्या मालकीचे भूखंड व महत्वाच्या ठिकाणचे ओपन स्पेस भू माफियांनी ताब्यात घेतले आहेत.

या प्रकरणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार



केल्यानंतर शिंदे यांनी बीडमधील बोगस पीटीआर, पीआर कार्ड प्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते. या आदेशानंतर नगर पालिकेने बोगस पीटीआर व पीआर कार्ड प्रकरणी चौकशी समिती नेमली असल्याची माहिती जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिली. दरम्यान मुख्याधिकाऱ्यांनी नेमलेल्या चौकशी समितीमुळे नगर पालिकेतील बोगस पीटीआर व पीआरचे रॅकेटचा पर्दाफाश होणार असून पालिकेच्या मालकीचे असलेले ओपनस्पेस अतिक्रमण मुक्त होतील असे मुळूक यांनी म्हटले आहे. शहरातील भू माफियांनी नगर पालिका कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन शहरातील महत्वाच्या ठिकाणी असलेल्या ओपन स्पेसवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. एवढेच नाही तर कर्मचाऱ्यांना हाताशी करुन ओपन स्पेसचे बोगस पीटीआर आणि पीआर कार्डही काढले आहेत. या प्रकरणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन दिले. या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधान सचिव यांना बीड नगर पालिकेतील बोगस पीटीआर, पीआर व अनाधिकृत अतिक्रमण करुन गिळंकृत केलेल्या ओपन स्पेस संदर्भात चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर मुख्याधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमली आहे.

# मराठा आणि कुणबी विद्यार्थ्यांसाठी जिल्हा स्तरावर वसतीगृह सुरु करा

**● आ.विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी**



मुंबई । प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनात सरकारने राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मराठा आणि कुणबी समाजातील विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. सारथीकडून या बाबत प्रक्रिया सुरु करण्यात आली मात्र उच्च शिक्षण विभाग आणि नियोजन विभागातील विसंवादामुळे छत्रपती शिवाजी महाराज सारथी जिल्हास्तरीय वसतीगृह स्थापन करण्यास विलंब होत असून शासनाने या बाबत सुधारीत शासन निर्णय करून मराठा व कुणबी विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरावर वसतीगृह सुरु करावेत अशी मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी विधानसभेत केली आहे.







# अंबाजोगाई न.प.कडून शहरात दूषित पाणीपुरवठा



## दूषित पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांचे आरोग्य आले धोक्यात

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषद पाणी पुरवठा विभाग सद्या शहरात दूषित पाणी पुरवठा करून शहरातील नागरिकांच्या जीवाशी खेळ खेळत असल्याचे दिसून येत आहे.अंबाजोगाई नगर परिषदे मध्ये कोट्यावधीची जलशुद्धीकरण यंत्रणा कुचकामी ठरत असून नगर परिषदेच्या नळाला संपूर्ण शहरात अशा पद्धतीचं पूर्ण पिवळं पाणी येत आहे. आधीच आठ दिवसाआड पाणीपुरवठा होत असताना आता हा दूषित पाणीपुरवठा होत असल्याने अंबाजोगाई नगरपरिषद नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचं दिसून येत आहे, यावर जिल्हा प्रशासन व नगर परिषद प्रशासन मूग गिळून बसले असल्याने शहरातील नागरिकांचा नगर परिषदे विरुद्ध रोष पसरत आहे. यावर तात्काळ दखल घेऊन हा दूषित पाणी पुरवठा बंद करण्यात येऊन शुद्ध पाणी पुरवठा सुरु करण्यात यावा अशी मागणी शहरातील नागरिक करीत आहेत.

**शहरामध्ये नगर पालिकेच्या वतीने सध्या दूषित पाणी पुरवठा केला जात आहे. त्याकडे प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन शुद्ध पाणीपुरवठा करावा अन्यथा डीवायएफआय संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल व तेच दूषित पाणी प्रशासनाला पाजण्यात येईल. – सुहास चंदनशिव (डीवायएफआय जिल्हा उपाध्यक्ष)**

# बीड जिल्हा रुग्णालयातील कोविड काळातील भ्रष्टाचार प्रकरणी तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सकांना निलंबित करण्यात येणार



▸ सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**मुंबई । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालयातील कोविड काळातील भ्रष्टाचार प्रकरणी तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सकांना तात्काळ निलंबित करण्यात येईल. पुढील तीन महिन्यांत या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिले. याबाबत सदस्य नमिता मुंदडा यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती.

मंत्री आबिटकर म्हणाले, कोविड काळात झालेला भ्रष्टाचार हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. दोषींना कोणतीही माफी दिली जाणार नाही. या प्रकरणी सखोल चौकशीसाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे. पुढील तीन महिन्यांत या प्रकरणाची चौकशी पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## गंगाभारती महाराज पतसंस्थेतील ठेवीदारांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर जन आक्रोश

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील पतसंस्था बुडण्याचे प्रमाण जास्त प्रमाणात वाढले असून त्यातच बीड तालुक्यातील करचुंडी येथील असणारी गंगाभारती महाराज पतसंस्था मागील दोन ते तीन वर्षापासून बुडीत असून त्यामध्ये ठेवलेल्या ठेवीदारांच्या ठेवी जवळ पास पाच ते सहा कोटी रुपये असुन,परत देत नसल्याने तसेच एक वर्षांपूर्वी सबंधित संस्थेतील कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल असून अद्याप ते फरारच आहेत, संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव व्यवस्थापक संचालक मंडळ शाखाधिकारी व कर्मचारी यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा या प्रमुख मागणीसाठी समस्त ठेवीदारांसह युवा ग्रामीण पत्रकार संघाचे युवा आघाडी जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली दि.२५ मार्च रोजी जिल्हाधिकारी




यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला होता,या दरम्यान वेळी ठेवीदारांचा आवाज म्हणून ओळखले जाणारे प्रा.सचिन उबाळे यावेळी तिथे उपस्थित होते.मोठ्या प्रमाणावर ठेवीदार देखील जमले होते. अखेर तालुका उपनिबंधक यांच्या मध्यस्थिने तसेच सर्व ठेवीदार यांच्याशी सविस्तर चर्चा करुन, उपोषण स्थगित करण्यात आले.

### धर्मादाय सह आयुक्त कार्यालयाच्या सेवा ऑनलाईन

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

धर्मादाय सह आयुक्त कार्यालयाने सन २०२४ मध्ये एकूण ८२३ बदल अर्ज व इतर न्यायिक प्रकरणे निकाली काढली आहेत. प्रलंबित बदल अर्ज व इतर न्यायिक प्रकरणे जलदगतीने निकाली काढण्याचे काम सुरू आहे.

## दलित-आदिवासींचा निधी वळवू नये

### राज्यपालांची भेट घेवून मंत्री रामदास आठवलेंनी दिले निवेदन

**मुंबई । प्रतिनिधी**

अनुसुचित जाती-जमातीसाठी राखीव असणारा निधी अन्य खात्यामध्ये वर्ग करण्यात येवू नये.अशी आग्रही मागणी करत,परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशींच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या पोलिसांवर तातडीने कारवाई करावी.यासह विविध मागण्यांचे निवेदन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी राज्यपाल सी.पी.राधाकृष्ण यांच्याकडे केल्या आहेत.



महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांची रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवलेंसह त्यांच्या शिष्टमंडळाने सोमवार (दि.२४) रोजी विविध मागण्यांसाठी भेट घेतली.यावेळी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, अविनाश म्हातेकर, सिद्धार्थ कासारे,चंद्रकांत कांबळे आदी उपस्थित होते.

यावेळी मंत्री रामदास आठवले यांनी महाराष्ट्राच्या विविध विषयांवर चर्चा केली. रामदास आठवले म्हणाले की, राईट टू एज्युकेशन या कायद्याअंतर्गत १ ले ८ वी पर्यंतचे शिक्षण मोफत असुन त्यामध्ये वाढ करुन ९ वी आणि १० वी चे वर्ग सुध्दा राईट टु एज्युकेशन कायद्याअंतर्गत समाविष्ट करण्यात यावेत. त्यामुळे १ ले १० पर्यंत राईट टु एज्युकेशनच्या माध्यमातुन गरिबांना मोफत शिक्षण राहील.यासाठी राज्यपालांनी हे प्रयत्न करावेत.मंत्री रामदास आठवले असही म्हणाले की, परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशींचा एकमेव पोलीस मारहाणीत मृत्यू झाला आहे. त्यामुळे जबाबदार पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी यांच्यावर निलंबनाची कारवाई केली जावी.तसेच बीड जिल्ह्यातील आष्टी येथील विकास बनसोडे प्रकरणातही योग्य ती कारवाई केली जावी. दलित-आदिवासींचा निधी इतर ठिकाणी वळविला जातो आहे, ही बाब अतिशय गंभीर असून दलित-आदिवासी समाजावर हा एक प्रकारे न्याय होतो आहे. देशात दलित-आदिवासींवर दिवसेंदिवस अन्याय अत्याचार वाढताना दिसून येत आहेत. त्यामुळे आपण याकडे जातीने लक्ष केंदित करावे. भूमिहीनांना पाच एकर जमीन देण्यात यावी, गायरान जमिनी संदर्भात २०२० पर्यंत मुद्दतवाढ करुन गायरान जमिनी नियमाकूल कराव्यात. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची अमलबजावणी करावी. नोकरी संदर्भात खासगी क्षेत्रात आरक्षण धोरण लागू करावे. आदी मागण्यांचे निवेदन मंत्री रामदास आठवले यांनी राज्यपालांना दिले आहे.

## महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

### जयभिम महोत्सव:विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीकडून गेल्या १५ वर्षापासून जयभिम महोत्सव साजरा केला जातो आहे. त्या अनुषंगाने यंदाही महापुरुष सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त इयत्ता ८ वी ते १२ वी मराठी, इंग्रजी माध्यम जिल्हास्तरीय 'महापुरुष सामान्य ज्ञान' स्पर्धा आयोजित केली आहे. त्या स्पर्धेत एकूण १०० गुणांचे ५० प्रश्न असणार आहेत. सदरील स्पर्धा येत्या (दि.३१) मार्च रोजी सकाळी ठीक ११ ते १२ वेळेत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तालुक्यातील टॉप १०



विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा तुलसी संगणक शास्त्र महाविद्यालय, आदर्श नगर, बीड. या ठिकाणी (दि.६) एप्रिल रोजी ११ ते १२ वाजता होणार आहे. त्याच दिवशी बक्षीस वितरण केले जाणार आहे.

या महापुरुष सामान्य ज्ञान स्पर्धेत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे.असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे. दरम्यान विद्यार्थ्यांनी (दि.२९) मार्चपर्यंत नाव नोंदणी करावी, नाव नोंदणी करण्यासाठी स्पर्धा समिती प्रमुख प्रा.अशोक गायकवाड, ९७६६९०३९०, भारत मगर-९३७३६३६८६३,

प्राचार्य प्रदिप गाडे ९४२२७४४३००, सुमित जोगदंड ९४२२३३२२९५,प्रा.राम गायकवाड

९४२३२०३१९९, एड. राजेश शिंदे ९७६५५०४७४०, महादेव इनकर ९४२०१७११७७ यांच्या या मोबाईलवर संपर्क साधावा.असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

## सौ.के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालय, बीडच्या ०७ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखती मध्ये निवड

**बीड । प्रतिनिधी**

श्री अनंत कृषी विकास प्रतिष्ठान या संस्थेच्या सौ. के.एस.के (काकू) कृषि महाविद्यालय, बीड या ठिकाणी दि. २३/०३/२०२५ रोजी झायडेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या वतीने फील्ड डेव्हलपमेंट ऑफिसर या पदाकरिता महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केले होते. मुलाखतीस उपस्थित विद्यार्थ्यांपैकी सात विद्यार्थ्यांची निवड कंपनीमार्फत करण्यात आलेली आहे. ही कंपनी शेतीसाठी रासायनमुक्त जैविक अन्नद्रव्यांची उत्पादने तयार करण्याचे काम करते. कंपनीच्या वतीने श्री संदीप माळी व श्री महेंद्र बरबडे, रिजनल सेल्स ऑफिसर यांनी या मुलाखती घेतल्या होत्या. फील्ड डेव्हलपमेंट



ऑफिसर या पदाकरिता बांगर वैभव, गोरे हनुमान, गवारे सुरज, दारुंटे अंगद, अलगट आशिष, श्रीवत्स व राजशेखर या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थी व पालक यांनी समाधान व्यक्त केले. कृषि अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खासगी क्षेत्रासह सरकारी क्षेत्रातही रोजगाराच्या संधी ग्रामीण भागातील युवकांसाठी उपलब्ध आहेत, त्यासाठी युवकांना कृषिविषयक शिक्षण आत्मसात करण्याची आवश्यकता आहे. या महाविद्यालयामार्फत सातत्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास आणि सर्वांगीण विकासाकरिता महाविद्यालयाचे वतीने नेहमीच प्रयत्न केले जातात. विविध कंपन्यांना लागणारी कुशलता विचारात घेऊन त्याबद्दलचे मार्गदर्शन केल्या जाते. याचा नेहमीच विद्यार्थ्यांना फायदा होतो. त्याचेच फलित म्हणजे या ०७ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखती मधून निवड झाली आहे असे प्रतिपादन संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके सर यांनी केले. तसेच कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना डॉ. एस.पी. मोरे सर यांनी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत विविध क्षेत्रातील नोकरीसाठी कॅम्पस मुलाखतींचे आयोजन केले जाते. या कॅम्पस मुलाखतीचे नियोजन डॉ. एस.टी. शिंदे यांनी केले.

## तलवाडा जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा विद्यार्थी मयूर गांधलेचे नवोदय परीक्षेत घवघवीत यश

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत इयत्ता पाचवी मध्ये शिक्षण घेत असलेला ग्रामिण भागातील विद्यार्थी मयूर सुरेश गांधले ह्या विद्यार्थ्यांने गेल्या काही दिवसा पूर्वी म्हणजेच दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या नवोदय विद्यालयाच्या परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले असुन मयुरने केलेल्या या यश संपादना मुळे तलवाडा जि. प. शाळे बरोबरच आपल्या आई वडिलाच्या नाव लोकिकतेत भर पढल्याने सर्व स्तरातुन मयूर या चिमुकल्या बाळावर शुभेच्छेचा वर्षाव होताना दिसून येत आहे. तलवाडा येथील जि. प. माध्यमिक शाळेत अवघ्या पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत आसलेल्या मयूर सुरेश गांधले या विद्यार्थ्याने वडील सुरेश गांधले व आई सौ. गांधले यांच्या प्रयत्ण व मार्गदर्शना नुसार जवाहरलाल नवोदय विद्यालय गढी येथे पुढील शिक्षणासाठी पात्रअर्थी परिक्षेत परिक्षा देऊन यश संपादन करत विज्ञाना मध्ये या विद्यालयात प्रवेश घेण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले.



त्यांच्या कष्टाचे चीज करत त्याने आपल्या शाळेचे व आपल्या आई-वडिलांचे नाव उज्वल करण्यासाठी घेतलेली मेहनत ही आज या कमी वयात देखील खऱ्या अर्थाने यशस्वी करून परीक्षेमध्ये घवघवीत यश प्राप्त केले त्यामुळे तलवाडा जि. प. शाळेचे मुख्याध्यापक विजय डोंगरे, वर्ग शिक्षक बंडे सर, तातुडे मॅडम, खेत्रे सर, डोंगरे सर, कवरे सर, शेळके मॅडम, हंबर्डे मॅडम, सगळे सर, पी एस राठोड सर, एस एस राठोड सर, सर्व शिक्षकवृंद व मित्रपरिवार कडून मयूर या चिमुकल्या बाळाचे कवतुक करण्यात येत असुन पुढील यशस्वी सफलते संदर्भात मयूर या बाळावर शुभेच्छेचा वर्षाव होत आहे, मयूर ने अभ्यासात दाखवलेले धैर्य आणि अभ्यासातील चिकाटी यश गाठण्याचे लक्ष मयूरच्या भावी आयुष्याचे खरे कारण ठरणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अशा नव नवीन स्पर्धा परीक्षेमध्ये आपला सहभाग नोंदवून आपल्या आई-वडिलांचे व शाळेचे नाव लौकीक करावे आसे मनोगत मयूर या बाळाचे पालक सुरेश गांधले यांनी व्यक्त केले आहे.


### जाहीर प्रगटन

अ‍ॅड. एल आर गंगावणे

**मा. श्रीमती पी डी चव्हाण ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ४८३/२०२५, शहाजी पि. ज्ञानोबा सुरवसे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. शहाजी पि. ज्ञानोबा सुरवसे, वय - ६७ वर्षे, धंदा - शेती, रा. एम आय डी सी अयोध्या नगर, बहिरवाडी, ता. जि. बीड २. रुपाली भ्र. लक्ष्मीकांत नाईकनवरे, वय - ३६ वर्षे, धंदा - घरकाम रा. मारोती मंदीराजवळ, स्वराज्य नगर बार्शी रोड, बीड ता. जि. बीड ३. राहुल चि. शहाजी सुरवसे, वय-३४ वर्षे, धंदा- शेती, रा. अयोध्या नगर, बहिरवाडी, ता. जि. बीड, ४. संदीप पि. शहाजी सुरवसे, वय-३१ वर्षे धंदा शेती, रा. एम आय डी सी अयोध्या नगर, बहिरवाडी, ता. जि. बीड (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात लताबाई भ्र. शहाजी सुरवसे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **लताबाई भ्र. शहाजी सुरवसे** यांचा मृत्यु दिनांक ०४/१०/२०२३ रोजी एम आय डी सी आयोध्या नगर, बहिरवाडी, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क ०१ हा मयताचा पती आहे. अर्जदार क २ ही विवाहीत मुलगी आहे. अर्जदार मयताची मुले आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत लताबाई भ्र. शहाजी सुरवसे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९ मार्च २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ एप्रिल २०२५**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. के सी बागल मॅडम, ८ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ५१९ / २०२५**

**रामा वि. निरंक (मार्फत ॲड. एस.बी. खाडे बीड)**

ज्याअर्थी मयत नामे **राधाबाई भ्र. कुंडलिक साळुंके रा. पाली ता.जि. बीड हे दि. ०३/०५/२०२०** रोजी मौजे जिल्हा रूग्णालय बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १) रामा कुंडलिक सांळुके, २) तारामती अर्जुन सांळुके ३) अविनाश अर्जुन सांळुके ४) अभिषेक अर्जुन सांळुके ५) अश्विनी सुनिल चव्हाण, सर्व रा. पाली ता. जि. बीड,

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाण का यदशावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे राधाबाई भ्र. कुंडलिक साळुंके रा. पाली ता.जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज २५/०३ /२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यांनिशी दिले.

**पुढील तारीख : ०५.०५.२०२५**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का